# Various Filmcity News and Articles

THE TIMES OF INDIA, MUMBAI
THURSDAY, JULY 30, 2026

## Film City seeks 14 acres at GMLR for new shooting hub

Clara.Lewis@timesofindia.com

**Mumbai:** The Maharashtra Chitrapat, Rangbhoomi ani Sanskrutik Vikas Mahamandal Maryadit, which runs Film City (Dadasaheb Phalke Chitranagari), has sought the recently cleared 14-acre land parcel along the Ghatkopar-Mankhurd Link Road to set up a sub-centre offering outdoor locations for film shoots.

In a letter to Mumbai Suburban Collector Saurabh Katiyar last month, Film City administrative director Swati Mhase-Patil said the existing 521-acre Film City has become inadequate to meet the growing demand for film shoots. She said the BMC's Goregaon-Mulund Link Road project has rendered certain areas unusable for filming. The construction of the underground tunnel through Film City has completely halted shooting at 11 outdoor locations. "Nearly 19 acres is affected by the project, creating a shortage of outdoor locations for film shooting, and we are unable to meet the demands of production companies," the letter states.

The letter further says the state government does not have land in Mumbai's suburbs to provide for outdoor shooting locations. "The corporation has been scouting for land and has learnt that a 14-acre land parcel recently cleared of encroachments is available. It is important that the corporation is given the land," it reads.

The Mumbai suburban collector's office has identified encroached revenue land and is clearing post-2011 encroachments that are not protected by law. The 14-acre plot along the Ghatkopar-Mankhurd Link Road, largely occupied by commercial establishments, was the second parcel to be cleared after a 10-acre plot in the same vicinity. The 10-acre plot has been handed over to the central jail authorities.

Katiyar said Film City's proposal seeking the 14-acre plot has been forwarded to the state government for approval. On Thursday, the collector's office is set to carry out another demolition drive along the Ghatkopar-Mankhurd Link Road to clear unauthorised commercial establishments that came up after 2011.

### Survey of pre-'11 govt land slums

**Mumbai:** State revenue minister Chandrashekhar Bawankule on Wednesday announced a survey of slum dwellers living on govt land prior to 2011. The survey will be conducted in Mumbai and Pune to expedite the regularisation of these structures. "Pre-2011 structures in certain areas of Mumbai city, the suburbs and Pune have not been regularised. A survey will be carried out and the report submitted to the government within six months," he said. TNN

### बोधचिन्ह, गीत, चित्रफितीचे मंत्री ॲड. शेलारांच्या हस्ते अनावरण

# फाळके चित्रनगरीचे 'सुवर्ण' वर्ष

▶ **मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टीसह भारतीय चित्रपट आणि दृक-श्राव्य क्षेत्राला गेली पाच दशके भक्कम पायाभूत सुविधा आणि निर्मितीसाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा दिमाखदार शुभारंभ सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात चित्रनगरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचे अनावरण, सुवर्ण महोत्सवी गीताचे लोकार्पण तसेच चित्रनगरीच्या पाच दशकांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेणाऱ्या दृक-श्राव्य चित्रफितीचे अनावरण करण्यात आले.यावेळी चित्रनगरीच्या पाच दशकांच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पे, ऐतिहासिक क्षण अधोरेखित करणाऱ्या कॉफीटेबल बुकचे तसेच 'चित्रपताका' नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.



## नफ्यातून २ कोटी रुपयांचा लाभांश शासनास

सोहळ्यात चित्रनगरीच्या विकासात, मराठी आणि भारतीय चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत योगदान देणाऱ्या विविध निर्मिती संस्थांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी, सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे-पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, कलाकार, निर्माते आणि चित्रपटसृष्टीतील मान्यवर उपस्थित होते. फाळके चित्रनगरीने गेल्या ५० वर्षांत केवळ चित्रपट आणि दृक-श्राव्य क्षेत्राच्या विकासापुरती आपली भूमिका मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीही जपली आहे. यंदाही चित्रनगरीच्या ४९ व्या वर्धापनदिनानिमित्त आणि राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ५ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीला देण्यात आला. तसेच वार्षिक अहवालानंतर नफ्यातून २ कोटी रुपयांचा लाभांश शासनास देण्यात आला. चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे-पाटील यांनी यासंदर्भातील दोन्ही धनादेश सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्याकडे सुपूर्त केले.

**लोकमत**

# दादासाहेब फाळके चित्रनगरीला पालिकेकडून २० कोटींचा 'लगान'

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता प्रकल्पातील दुहेरी बोगद्याच्या कामामुळे दादासाहेब फाळके चित्रनगरीचे आर्थिक नुकसान होत आहे. येथील जमीन व चित्रीकरण मैदानांच्या वापरापोटी चित्रनगरीला २० कोटी ८ लाख रुपये भाडे देण्याचा प्रशासनाचा प्रस्ताव गुरुवारी स्थायी समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. प्रकल्पामुळे चित्रनगरीतील मोठे सेट काढल्याने उत्पन्न कमी झाले असून दिल्या जाणाऱ्या भाड्यातून चित्रनगरीला काही प्रमाणात दिलासा देण्याचा हा प्रयत्न असल्याचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांनी स्पष्ट केले.

जोडरस्ता प्रकल्पाच्या टीबीएमचे सुटे भाग आणि बोगदा खोदकामातून निघणारा गाळ साठविण्यासाठी चित्रनगरीतील 'जोश व जोकर' ही मैदाने

**३१ मार्च २०२९ पर्यंतचा कालावधी गृहीत धरून ही रक्कम निश्चित केली आहे, असे अतिरिक्त आयुक्तांनी सांगितले.**

पालिकेने तात्पुरत्या स्वरूपात ताब्यात घेतली आहेत. येथील जमीनपट्ट्यासाठी ५१.३० लाख, जोशसाठी २.४४ कोटी आणि जोकरसाठी १.६८ कोटी रुपये भाडे पालिकेने निश्चित केले आहे. या तिन्ही जागांसाठी १८ टक्के जीएसटीसह प्रतिवर्षी ५ कोटी ४६ लाख ९४ हजार ८०० रुपये भाडे देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आणण्यात आला.

शिंदेसेनेच्या यामिनी जाधव, भाजपच्या प्रीती सातम, राष्ट्रवादीच्या (अ.प.) सईदा खान, काँग्रेसचे अशरफ आझमी, उद्धवसेनेच्या मीनाक्षी पाटणकर यांनी चित्रनगरीची जागा कुणाची आहे आणि जागेचे भाडे कोणत्या आधारावर निश्चित केले असे प्रश्न उपस्थित केले.

मुंबई तरुण भारत
महा MTB www.mahamtb.com
Main Edition | 2026-10-03 | Page- 3
epaper.mahamtb.com

# चित्रनगरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा शुभारंभ!

- बोधचिन्हाचे अनावरण, सुवर्ण महोत्सवी गीताचे लोकार्पण आणि गौरवशाली वाटचालीचा आढावा
- 'कॉफीटेबल बुक'चे आणि 'चित्रपताका' नियतकालिकाचे प्रकाशन; निर्मिती संस्थांचा सन्मान

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टीसह भारतीय चित्रपट, दृक्श्राव्य क्षेत्राला गेली पाच दशके भक्कम पायाभूत सुविधा आणि निर्मितीसाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा शुभारंभ सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आला.



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि 'महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळा'च्यावतीने आयोजित या सोहळ्यात चित्रनगरीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचे अनावरण, सुवर्ण महोत्सवी गीताचे लोकार्पण आणि चित्रनगरीच्या पाच दशकांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेणाऱ्या दृक्श्राव्य चित्रफितीचे अनावरण करण्यात आले. यावेळी चित्रनगरीच्या पाच दशकांच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पे, ऐतिहासिक क्षण अधोरेखित करणाऱ्या 'कॉफीटेबल बुक'चे आणि 'चित्रपताका' नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले. या सोहळ्यात चित्रनगरीच्या विकासासह मराठी आणि भारतीय चित्रपटसृष्टीच्या वाटचालीत योगदान देणाऱ्या विविध निर्मिती संस्थांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका स्वाती म्हसे-पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, कलाकार, निर्माते आणि चित्रपटसृष्टीतील मान्यवर उपस्थित होते.

चित्रनगरीच्या ४९व्या वर्धापनदिनानिमित्त आणि राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाच लाखांचा धनादेश 'मुख्यमंत्री सहायता निधी'ला देण्यात आला.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध सांस्कृतिक, कलात्मक आणि चित्रपटविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ, निर्माते, दिग्दर्शक, तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांना या उपक्रमांशी जोडण्यात येणार आहे.

Powered by Bharati Web

मुंबई तरुण भारत
Main Edition | 2026-10-03 | Page- 3
epaper.mahamtb.com

# दादासाहेब फाळके चित्रनगरीसाठी मानखुर्दची १४ एकर जमीन

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या बाह्य चित्रिकरणासाठी मुंबईतील मानखुर्द येथील सुमारे १४ एकर शासकीय जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला देण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने हा निर्णय घेण्यात आला.

मौजे मानखुर्द, ता. कुर्ला येथील सर्व्हे क्रमांक १३८ पैकी आणि लगतच्या मिळकतीतील अंदाजे १४ एकर म्हणजेच सुमारे ५६ हजार ६६६ चौ.मी. जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला बाह्य चित्रीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जमीन 'महाराष्ट्र जमीन महसूल जमीन संहिता, १९६६'मधील 'कलम ४०'नुसार प्राप्त अधिकारात महसूलमुक्त व भोगाधिकार मूल्यरहित किमतीने देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

याबाबत महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, ''महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टीला आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. दादासाहेब फाळके यांच्या नावाने असलेल्या चित्रनगरीच्या विकासासाठी बाह्य चित्रीकरणासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देताना शासनाने सार्वजनिक हित आणि जमिनीचा नियोजनबद्ध वापर यांचा समतोल साधला आहे.

Powered by Bharati Web

पुण्यनगरी

## दादासाहेब फाळके चित्रनगरीसाठी मानखुर्दची १४ एकर जमीन

**मुंबई** : दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या बाह्य चित्रीकरणासाठी मुंबईतील मानखुर्द येथील सुमारे १४ एकर शासकीय जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला देण्यास महसूल विभागाने मान्यता दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी दिली.

मानखुर्द येथील सर्व्हे क्रमांक १३८ पैकी तसेच लगतच्या मिळकतीतील अंदाजे १४ एकर म्हणजेच सुमारे ५६ हजार ६६६ चौ.मी. जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला बाह्य चित्रीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जमीन महाराष्ट्र, जमीन महसूल, जमीन संहिता, १९६६ मधील कलम ४० नुसार प्राप्त अधिकारात महसूलमुक्त आणि भोगाधिकार मूल्यरहित किमतीने देण्यास सरकारने मान्यता दिली आहे. दादासाहेब फाळके यांच्या नावाने असलेल्या चित्रनगरीच्या विकासाकरिता बाह्य चित्रीकरणासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देताना शासनाने सार्वजनिक हित आणि जमिनीचा नियोजनबद्ध वापर यांचा समतोल साधल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.



सामना

## चित्रनगरीसाठी मानखुर्दमध्ये १४ एकर जागा

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) – दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या बाह्य चित्रीकरणासाठी मानखुर्द येथील सुमारे १४ एकर शासकीय जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला देण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे.

मानखुर्द येथील १४ एकर म्हणजेच सुमारे ५६ हजार ६६६ चौ. मी. जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला बाह्य चित्रीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल जमीन संहिता, १९६६ मधील कलम ४० नुसार प्राप्त अधिकारात महसूलमुक्त आणि भोगाधिकार मूल्यरहित किमतीने देण्यास सरकारने मान्यता दिली आहे.



# 'छबिला'च्या प्रदर्शनाने मंडळाची वर्षपूर्ती

मराठी चित्रपटांचा आशय, कलात्मकता आणि तांत्रिक बाजू समजून घेणारा प्रेक्षकवर्ग घडविण्याच्या उद्देशाने सुरू झालेल्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळाने वर्षपूर्ती केली आहे. यानिमित्ताने ६२व्या महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळवलेल्या 'छबिला' या चित्रपटाचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या या उपक्रमाची सुरुवात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनातून आणि महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या पुढाकारातून वर्षभर विविध चित्रपटांचे प्रदर्शन आणि संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या उपक्रमातून चित्रपटाच्या कथानकासोबतच दिग्दर्शन, अभिनय, संगीत, छायांकन आणि तांत्रिक बाबींचा आस्वाद घेण्याची संधी रसिकांना मिळाली. वर्षभरात 'संत तुकाराम', 'जीव', 'अवघाचि संसार', 'जिप्सी', 'हमाल दे धमाल', 'पप्पा सांगा कुणाचे...', 'गोंधळ' आणि सत्यजित रे दिग्दर्शित 'पाथेर पांचाली' अशा विविध धाटणीच्या चित्रपटांचे विशेष प्रदर्शन करण्यात आले. चित्रपटांच्या टीमसोबत संवाद आणि गप्पांच्या माध्यमातून प्रेक्षकांना चित्रपटनिर्मितीचा प्रवास जाणून घेता आला. याशिवाय मंडळाच्या उपक्रमाची दुसरी आवृत्ती दिल्ली येथे सुरू करण्यात आली आहे.

लोकमत

# फाळके चित्रनगरी ही महाराष्ट्राच्या कला-संस्कृतीची कर्मभूमी : शेलार

## सेवा संकल्प अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दादासाहेब फाळके चित्रनगरी ही केवळ चित्रपटांच्या चित्रीकरणाचे ठिकाण नसून महाराष्ट्राच्या कला आणि संस्कृतीची कर्मभूमी आहे. कलाकारांसाठी अधिक सुविधा, तंत्रज्ञांसाठी नव्या संधी आणि युवा पिढीसाठी आधुनिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे, असे राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी सांगितले.



**आशिष शेलार**
राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने आयोजित केलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध लोकसेवा व सांस्कृतिक उपक्रमांचे लोकार्पण मंत्री शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. फिल्मसिटी व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सहव्यवस्थापक प्रशांत साजणीकर, एनजीएमएच्या संचालक निधी चौधरी आदी उपस्थित होते.

## संगीत परंपरेला आधुनिक माध्यमांची जोड

युवा पिढीला डिजिटल माध्यमातून कला सादरीकरणाची संधी मिळण्यासाठी रील स्पर्धा व रील व्यवसाय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

**'श्री महागणपतिस्तोत्र' संगीत व्हिडिओ व 'अभंग रिपोस्ट'च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या भक्ती व संगीत परंपरेला आधुनिक माध्यमांची जोड देण्यात आली आहे. आधुनिक निर्मिती केंद्र म्हणून चित्रनगरीला विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे मंत्री शेलार यावेळी म्हणाले.**

## 'विकासासाठी नागरिकांनीही योगदान द्यावे'

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वाढदिवस साजरा करण्याऐवजी 'सेवा संकल्प' घेऊन समाजासाठी काम करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार जनसेवा, कर्मचारी सेवा आणि सांस्कृतिक क्षेत्राच्या उत्थानासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या निमित्ताने सेवाभावाची भावना जोपासत देशाच्या विकासासाठी नागरिकांनीही योगदान देण्याचे आवाहनही मंत्री शेलार यांनी केले.

## 'लेन्स अँड लेगसी : बॉलिवूडचा दृक्-प्रवास'

कलाकार, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने 'डॉक्टर्स फॉर यू'च्या माध्यमातून दोन नव्या रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच संबंधित मनुष्यबळासाठी विनामूल्य बससेवा, चित्रनगरीतील अत्याधुनिक अग्निशमन यंत्रणा, नूतन समिती कक्षाचे उद्घाटन आणि चित्रनगरीतील स्टुडिओ क्रमांक १ चे लोकार्पण मंत्री शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय, नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट आणि चित्रनगरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लेन्स अँड लेगसी : बॉलिवूडचा दृक्-प्रवास' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटनही मंत्री शेलार यांच्या हस्ते करण्यात आले.

# हृदयनाथ मंगेशकर, सलीम खान यांना 'जीवनगौरव'

## चित्रपट पुरस्काराची घोषणा; प्रसाद ओक, राणी मुखर्जी यांचाही सन्मान






**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** मराठी भावसंगीत आणि चित्रपट संगीताला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना यंदाचा राज्य सरकारचा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. 'शोले, दीवार, जंजीर, डॉन, त्रिशूल' यांसारख्या अजरामर चित्रपटांचे कथा-लेखन करणारे सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

'धर्मवीर' चित्रपटामुळे चर्चेत आलेले अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार घोषित करण्यात आला. अभिनेत्री राणी मुखर्जी यांची राज कपूर विशेष योगदान पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने बुधवारी २०२५च्या पुरस्कारांची घोषणा केली.

चित्रपट क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या तसेच अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन आदी विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार दिले जातात.

# हृदयनाथ मंगेशकर यांना व्ही. शांताराम पुरस्कार

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

## सलीम खान, प्रसाद ओक, राणी मुखर्जी यांच्याही योगदानाचा गौरव





राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारा सन २०२५चा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ गायक-संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांना जाहीर करण्यात आला आहे. तर, स्वर्गीय राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ लेखक सलीम खान यांना जाहीर झाला आहे.

याशिवाय, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार अभिनेते व दिग्दर्शक प्रसाद ओक यांना, तर स्वर्गीय राज कपूर विशेष योगदान पुरस्कार प्रसिद्ध अभिनेत्री राणी मुखर्जी यांना जाहीर करण्यात आला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशीष शेलार यांनी या पुरस्कारांची घोषणा केली आहे. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनय, संगीत, निर्मिती, दिग्दर्शन आदी विविध क्षेत्रांत दीर्घकाळ उल्लेखनीय कार्य करून चित्रपटसृष्टीच्या समृद्धीत मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी हे प्रतिष्ठेचे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

लोकमत

# मनोरंजन क्षेत्रालाही पावसाचा फटका

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा फटका मनोरंजन क्षेत्रालाही बसला. सेटवर पाणी साचल्याने शूटिंगवर परिणाम झाला. कलाकारांना ट्रॅफिक जामचा सामना करावा लागला.

गोरेगाव फिल्मसिटी आणि इतर स्टुडिओमध्ये होणाऱ्या 'गुम है किसी के प्यार में', 'अनुपमा' आणि 'ये रिश्ता क्या कहलाता है' आदी हिंदी व काही मराठी मालिकांच्या शूटिंगवर परिणाम झाला. 'तुम देना साथ मेरा' आणि 'मिस्टर ॲण्ड मिसेस परशुराम' या मालिकांचे आउटडोअर शेड्यूल आणि इनडोअर शूटिंग रद्द करण्यात आल्याची माहिती मिळाली. आगामी भागांची बँक तयार असलेल्या निर्मिती संस्थांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव शूटिंग पूर्णपणे बंद ठेवले. एपिसोडची बँक नसलेल्या मालिकांच्या निर्मिती संस्थांना मात्र नाइलाजाने अंतर्गत सेटवरच काम करावे लागले. रिॲलिटी शो आणि चित्रपटांचे नियोजित प्रमोशनल इव्हेंट्स, मीडिया सेट व्हिजिट्स आणि मुलाखतींचे कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले. मुसळधार बरसणाऱ्या पावसामुळे गोरेगाव फिल्मसिटी, मढ आयलंड, नायगाव, ठाणे, मीरा रोड परिसरातील काही स्टुडिओमध्ये पाणी साचल्याने शूटिंगवर परिणाम झाला. शुटिंग बंद राहिल्याने सिनेसृष्टीशी संबंधित सर्व यंत्रणा ठप्प झाली होती. यामुळे आर्थिक फटकाही बसला होता.